Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

यशस्वी होण्यासाठी चुकीचा मार्ग निवडू नका!
(पान २ वर)



। रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक १३५ ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

### भाजप-अकाली दल आघाडीचे मजीठियांनी दिले संकेत

जालंधर : पुढील वर्षी पंजाबमध्ये होणाऱ्या निवडणुकीपूर्वी राजकीय घडामोडींना वेग आला आहे. शिरोमणी अकाली दलाचे वरिष्ठ नेते विक्रम सिंह मजीठिया यांनी पंजाबची जनता पुन्हा एकदा अकाली दल आणि भाजपला एकजूट पाहू इच्छित असल्याचे वक्तव्य केले आहे. यामुळे दोन्ही पक्ष एकत्र येण्याच्या चर्चांना जोर आला आहे. शिरोमणी अकाली दल आणि भाजपने दीर्घकाळापर्यंत एकत्र काम केले आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि प्रकाश सिंह बादल यांनी या आघाडीला मजबूत केले होते.कृषी कायद्यांच्या मुद्द्यांवर आमचे मार्ग वेगळे झाले होते, परंतु पंजाबममधील सामाजिक सलोखा अन् सीमावर्ती राज्याची स्थिती पाहता जनता पुन्हा दोन्ही पक्षांनी एकत्र यावे असे इच्छित असल्याचे मजीठिया यांनी स्पष्ट केले आहे.

## राहुल गांधी पुणे दौऱ्यावर, दिल्लीत मात्र घराला आंदोलकांचा वेढा

# महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद : राहुल गांधी

### पुण्यात हजारो मुलींसमोर राहुल गांधींचं मनुस्मृतीवर मोठं भाष्य

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली ।काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा 'छात्रों की गुंज' हा कार्यक्रम आज शनिवारी पुण्यात पार पडला आहे. या कार्यक्रमासाठी काँग्रेसकडून मागील काही दिवसांपासून मोठी तयारी सुरू होती.**

या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील काँग्रेसचे दिग्गज नेते पुण्यात ठाण मांडून होते. राहुल गांधी यांचा 'छात्रों की गुंज' हा चौथा कार्यक्रम होता. 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी 'झेन-झी'शी संवाद साधत विविध विषयांवर भाष्य केलं आहे.दिल्लीतील 'झेन-झी'च्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांचा हा कार्यक्रम महत्वाचा मानला जात होता. 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती. या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी 'झेन-झी'शी संवाद साधत महत्वाचं भाष्य केलं आहे.

मी आज या ठिकाणी राजकारणावर बोलण्यासाठी आलेलो नाही. तरुणांची संख्या ही भारताची मोठी ताकद आहे. मला अनेकदा विचारलं जातं की भारताची ताकद काय आहे? हा प्रश्न विचारल्यावर अनेक उत्तरे मिळतात. कोणी म्हणतं की आपली अर्थव्यवस्था, कोणी म्हणतं की आपलं सैन्य, कोणी म्हणतं की आपली आरोग्य व्यवस्था, तर कोणी कदाचित आपले लोक असंही म्हणतं. पण भारताची सर्वात मोठी ताकद किंवा सर्वात मोठी संपत्ती काय आहे, याबद्दल माझी भूमिका अगदी स्पष्ट आहे. ७० कोटी भारतीय महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. महिला शक्ती हीच देशाची ताकद आहे, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.महिला या पुरुषांच्या तुलनेत स्वभावतः अधिक संवेदनशील, सौम्य, दयाळू असतात,



म्हणूनच माझा ठाम विश्वास आहे की, भारतातील महिला हीच देशाची सर्वात मोठी संपत्ती आहे. जेव्हा मी पुरुषांशी बोलतो, तेव्हा महिला प्रामुख्याने तीन चौकटींमध्ये (किंवा भूमिकांमध्ये) पाहिले जाते. त्यांना मुलगी, पत्नी किंवा आई म्हणून पाहिले जाते. आता, पत्नी, मुलगी किंवा आई म्हणून ओळखले जाण्यात काहीच गैर नाही. परंतु हीच तुमची एकमेव ओळख असू शकत नाही, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

मनुस्मृतीने महिलांना तीन चौकटीत बसवलं. महिलांना स्वातंत्र्य नाही, असा मनुस्मृतीचा विचार आहे. महिला कधीच स्वतंत्र राहू नये हा मनस्मृतीचा डाव आहे. मात्र, तुम्ही तुमच्या स्वत:शिवाय दुसऱ्या कोणालाही बांधिल नाहीत, अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे.

आजच्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी दिलखुलास संवाद साधला. पुण्यातील या कार्यक्रमाला मुलींची, महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तरुणींच्या भविष्याबद्दल बोलताना राहुल गांधी यांनी काँग्रेसचं व्हिजनही सांगितलं. महिलांच्या उपस्थितीत त्यांनी पिंजरा तोडा असे आवाहन करत, महिलांनी त्यांच्यातील अद्वितीय क्षमता ओळखून सामाजिक बंधनातून मुक्त व्हावे, असं प्रतिपादन केलं.

राहुल गांधी यांनी आपल्या सभेचे स्वरुप संवादात्मक ठेवले होते. या सभेमध्ये अनेक मुलींनी मंचावर जाऊन अडचणी मांडल्या. काही मुलींनी घरातून होत असलेली अडवणूक, रस्त्यावर फिरताना काढली जाणारी छेड, शिक्षणासाठी करावा लागणारा संघर्ष यावर याबाबत सांगितले. दुसरीकडे राहुल गांधी यांनीदेखील तरुणींना, मुलींना पुढे जाण्यासाठी संधी मिळाली पाहिजे, असे मत व्यक्त केले. तसेच सध्या देशात महिलांची स्थिती खूप गंभीर असल्याचे सांगताना काही आकडेवारी सांगितली.

#### सभेला आलेल्या ८० टक्के मुलींचा विनयभंग


राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात तसेच तरुणींसोबतच्या संवादात एक पीपीटीही सादर केली. या पीपीटीत त्यांनी भारतातील महिला हिंसाचाराचे आकडे मांडले. देशात अनेक ठिकाणी महिलांवर लैंगिक अत्याचार होतात. हिंसाचार होतो. परंतु बऱ्याच प्रकरणांची नोदं होत नाही, अशी चिंता यावेळी राहुल गांधींनी व्यक्त केली. देशात मुली जन्मन्याआधीच प्रत्येक वर्षी साडे चार लाख मुलगी अर्भकांची हत्या केली जाते. या सभेला आलेल्या साधारण ८० टक्के मुलींचा विनयभंग करण्यात आलेला आहे.

## पोषण आहाराचा निकृष्ट दर्जा दाखवणाऱ्या पुण्यातील 'त्या' अंगणवाडी सेविकेला दिलासा

### टीकेचे झोड उठताच सेवामुक्तीची कारवाई अखेर रद्द

**जन सम्राट टाईम्स**

**पुणे | (प्रतिनिधी):** पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव इथे पोषण आहाराचा निकृष्ट दर्जा दाखवणाऱ्या अंगणवाडी सेविका देवयानी उर्फ रेश्मा पारधी (Devyani Pardhi) यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अंगणवाडीतील पोषण आहाराच्या निकृष्ट दर्जाचा मुद्दा उपस्थित करत सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर केला प्रकरणी करण्यात आलेल्या निलंबनाची (Suspension) कारवाई आता रद्द करण्यात आली आहे. कार्यालयीन शिस्तभंग आणि सोशल मीडियाच्या वापरासंदर्भात देवयानी उर्फ रेश्मा पारधी यांच्यावर झालेली सेवामुक्तीची कारवाई आता रद्द करण्यात आली असून पुनर्स्थापनेचे आदेश पारधी यांना प्राप्त झाले आहेत. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सेवामुक्तीचा आदेश रद्द करून त्यांना पुन्हा अंगणवाडी सेविका पदावर रुजू करून घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे देवयानी पारधी यांना आता मोठा दिलासा मिळाला आहे.अंगणवाडीतील लहान मुलांना आणि गरोदर मातांना दिला जाणारा पोषण आहार निकृष्ट असल्याचा दावा करत अंगणवाडी सेविका देवयानी पारधी यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर केला होता. रेश्मा पारधी यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर हा व्हिडीओ टाकला होता. या व्हिडीओ अंगणवाड्यांमध्ये लहान मुलांच्या पोषण आहारासाठी प्रशासनाकडून पुरवला जाणारा कच्चा माल अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याचा गंभीर



आरोप देवयानी पारधी यांनी केला होता. त्यात त्या म्हणाल्या होत्या की, '9 ते 10 शिट्या काढूनही न शिजणारा पांढरा वाटाणा आणि शिजवूनही कच्चा राहणारा भरडा आम्ही लहान मुलांना कसा खाऊ घालायचा?' असा उद्विग्न सवाल त्यांनी उपस्थित केला होता. यावर कारवाई करण्याचं आवाहन त्यांनी एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंडे यांना केलं होतं. दरम्यान शासकीय कर्मचाऱ्यांनी तक्रारी मांडण्यासाठी ठरवून दिलेल्या नियमावली आणि आचारसंहितेचं पालन करावं, असं बालविकास प्रकल्प अधिकारी कुलदीप जाधव यांनी म्हटलंय. मात्र बडतर्फीवर पारधी यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे दाद मागण्याची संधी आहे. असेही त्यांनी सांगितलं होतं.दरम्यान, या व्हिडिओनंतर या घटनेचे पडसाद सोशल मीडियासह राज्याच्या राजकीय वर्तुळात देखील उमटल्याचे दिसून आले. तसेच प्रशासनाने केलेल्या कारवाईचा देखील जाब विचारण्यात आला. आता अखेर प्रशासनाने देवयानी पारधी यांच्यावरील निलंबनाची कारवाई मागे घेतली आहे. त्यामुळे सेविकेला दिलासा मिळाला असून, आता पोषण आहाराच्या दर्जाबाबत प्रशासन पुढे काय भूमिका घेणार, याकडे साऱ्यांचे लक्ष लागलं आहे.

## बंगालच्या उपसारगात मालवाहू जहाज बुडालं

### 24 खलाशी अडकल्याची माहिती

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** बंगालच्या उपसागरात धक्कादायक घटना घडली आहे. पारादीप बंदरातून लोहखनिज घेऊन जाणारे एक मालवाहू जहाज बुडाल्याची घटना घडली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुडालेलं जहाज हे पनामा ध्वजांकित आहे. दरम्यान, भारतीय नौदलाकडून बचावकार्य सुरु करण्यात आलं आहे. या जहाजावर 24 खलाशी अडकल्याची माहिती मिळत आहे. 1700 टन लोहखनिजाचा भुगा घेऊन हे वाहन निघाले होते. पारादीप बंदरातून लोहखनिज घेऊन जाणारे एक परदेशी जहाज समुद्रात बेपत्ता झाले आहे. पनामा ध्वज असलेले हे मालवाहू जहाज ओडिशाच्या किनाऱ्यापासून 240 सागरी मैल दूर बंगालच्या उपसागरात बुडाले. या घटनेमुळे जहाजावरील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत चिंता वाढली आहे. भारतीय तटरक्षक दल आणि भारतीय नौदलाने बचावकार्य सुरू केले आहे. दरम्यान, किती कर्मचाऱ्यांना वाचवण्यात यश आलं आहे याची माहिती मिळालेली नाही. बचावकार्यात मदत करण्यासाठी परिसरातील इतर जहाजांनाही सतर्क करण्यात आले आहे.भारतीय तटरक्षक दलाच्या पारादीप युनिटचे उपमहानिरीक्षक संजय नेगी यांनी सांगितले की, अंदमान आणि निकोबार युनिटतर्फे शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. बचाव पथके उद्या सकाळपर्यंत पोहोचतील. जहाजाचा शोध घेण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठी परिसरातील इतर जहाजांनाही सतर्क करण्यात आले आहे. सध्या उपलब्ध असलेल्या माहितीमधून जहाज बुडण्याचे नेमके कारण उघड होत नाही. जहाजावर 24 खलाशी होते, त्यापैकी 20 चिनी नागरिक, दोन म्यानमारचे नागरिक आणि एक बांगलादेशी असल्याची माहिती मिळत आहे. उर्वरित खलाशांची ओळख अद्याप निश्चित झालेली नाही. जहाज बेपत्ता झाल्यामुळे त्यावरील सर्व खलाशांच्या स्थानाबद्दल आणि सुरक्षिततेबद्दल चिंता वाढली आहे. जहाजात तांत्रिक बिघाड झाला होता, ते खराब हवामानात सापडले होते, की समुद्रात इतर कोणती आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली होती, हे सध्या अस्पष्ट आहे. बेपत्ता जहाजाचा शोध घेण्यासाठी आणि खलाशांशी संपर्क साधण्यासाठी सतत प्रयत्न सुरू आहेत. पनामा ध्वज असलेले हे जहाज 20 ऑगस्ट रोजी रात्री सुमारे साडेदहा वाजता 1700 टन लोहखनिजाची पूड घेऊन पारादीप येथून निघाले. संपर्क तुटला तेव्हा ते 200 सागरी मैल दूर होते.

### एनआयसीयूतील वॉर्मर मशिनला आग

छिंदवाडा | मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्हा रुग्णालयाच्या नवजात बालकांसाठीच्या अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) आज शनिवारी पहाटे वॉर्मरला आग लागल्यामुळे तीन नवजात बालके भाजून जखमी झाली आहेत. या घटनेनंतर रुग्णालय प्रशासनाने तिन्ही बालकांना तातडीने पुढील विशेष उपचारांसाठी जबलपूर मेडिकल कॉलेजमध्ये हलवले आहे. ही दुर्घटना पहाटे १ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास घडली. वॉर्मरच्या हिटिंग युनिटमधील फिलामेंटमध्ये अचानक ठिणगी पडल्याने ही आग लागली, यावेळी तीन नवजात बालके या वॉर्मरच्या आत होती.

## भाजपनं जेन झी सोबतचा संवाद वाढवण्यासाठी कंबर कसली!

**जन सम्राट टाईम्स**

**नाशिक | प्रतिनिधी:** नीट पेपरफुटी प्रकरणात जंतरमंतरवर झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर राजकीय पक्षांनी तरुणांवर अधिक लक्ष केंद्रित करण्यास सांगितलं. एकीकडे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा पुण्यात 'छात्रों की गुंज' कार्यक्रम होत असताना दुसरीकडे भाजपनं जेन झी सोबतचा संवाद वाढवण्यासाठी कंबर कसली आहे. यासाठी पक्षानं एक विशेष टीम तयार केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मंत्र्यांना दिलेल्या सूचनांनंतर काही दिवसांनी हा निर्णय घेण्यात आला आहे.विद्यापीठ आणि सरकारी शाळांमधील तरुणांशी थेट संवाद वाढवण्याच्या सूचना मोदींनी मंत्र्यांना दिल्या होत्या. पक्षातील एका वरिष्ठ सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जेन झीशी थेट संवाद साधण्यासाठी तयार करण्यात आलेल्या टीममध्ये भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, राष्ट्रीय महासचिव स्मृती इराणी, विनोद तावडे यांचा समावेश आहे. गुजरातचे मंत्री हर्ष संघवी, छत्तीसगडचे मंत्री ओपी चौधरी यांनाही टीममध्ये स्थान देण्यात आलं आहे. यासोबतच अन्य नेत्यांनादेखील जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत.

तरुणांच्या आशा, अपेक्षा, समस्या समजून घेण्याचा प्रयत्न भाजपकडून करण्यात येईल. जेन झी समोर



रोजगार, शिक्षण, परीक्षा, भविष्याशी संबंधित अनेक प्रश्न आहेत. या मुद्द्यांवरून पक्ष तरुणांशी थेट संवाद साधणार आहे. पंतप्रधानांच्या सूचनेनंतर भाजपनं तरुणांशी थेट संवाद साधण्याला विशेष महत्त्व दिलं आहे.

प्रस्तावित कार्यक्रमांनुसार विद्यापीठ आणि सरकारी शाळांमधील तरुणाईपर्यंत पोहोचण्याची तयारी केली जात आहे. कार्यक्रम केव्हा सुरू होणार, त्याचं स्वरुप काय असणार, याची माहिती लवकरच लवकरच समोर येण्याची शक्यता आहे. दिल्लीत गेल्याच महिन्यात विद्यार्थ्यांचं आंदोलन झालं. याच कालावधीत काँग्रेस नेते राहुल गांधीही सक्रिय झाले. त्यांनीही नीट पेपर फुटीचा मुद्दा हाती घेत थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन केलं. तरुण वर्गात आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून सुरू आहे. राहुल गांधी आज पुण्यात 'छात्रों की गूंज' कार्यक्रम घेत आहेत. त्या माध्यमातून ते तरुणांशी संवाद साधणार आहेत. याआधी त्यांनी कोटा, देहरादून, प्रयागराजमध्ये अशाच प्रकारे कार्यक्रम घेतलेले आहेत. आता भाजपनं तयारी सुरू केली आहे.नीट पेपरफुटी प्रकरणात जंतरमंतरवर झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर राजकीय पक्षांनी तरुणांवर अधिक लक्ष केंद्रित करण्यास सांगितलं. एकीकडे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा पुण्यात 'छात्रों की गुंज' कार्यक्रम होत असताना दुसरीकडे भाजपनं जेन झी सोबतचा संवाद वाढवण्यासाठी कंबर कसली आहे.


जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## दिल्लीत स्वाइन फ्लूचा धोका वाढला; आरोग्य यंत्रणा सतर्क

### ताप-खोकल्याकडे दुर्लक्ष न करण्याचा डॉक्टरांचा सल्ला, १७७७ रुग्णांची नोंद

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** दिल्लीत यंदा स्वाइन फ्लू म्हणजेच एच१एन१ संसर्गाचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. यावर्षी आतापर्यंत १७७७ रुग्णांची नोंद झाली असून, केवळ १४ दिवसांत ४३३ नवीन रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून, रुग्णालयांमध्ये उपचाराची पुरेशी व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, दिल्लीचे आरोग्यमंत्री पंकज कुमार सिंह आणि आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत दिल्लीतील स्वाइन फ्लूच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.




संसर्गाचा प्रसार, बाधित भाग आणि संभाव्य अधिक संसर्ग होणाऱ्या ठिकाणांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. २० ऑगस्ट रोजी दिल्लीत एच१एन१चे ११४ नवीन रुग्ण आढळले. त्यामुळे यंदाची एकूण रुग्णसंख्या १७७७ वर पोहोचली आहे. ६ ऑगस्टपर्यंत दिल्लीत १३४४ रुग्णांची नोंद होती. म्हणजेच अवघ्या १४ दिवसांत ४३३ नवीन रुग्ण आढळले. गेल्या वर्षी याच कालावधीत एच१एन१चे २२९ रुग्ण आढळले होते. त्या तुलनेत यंदा रुग्णसंख्या जवळपास आठ पटीने वाढली आहे.

पावसाळ्यात तापमानातील चढ-उतार आणि वाढलेली आर्द्रता यामुळे हंगामी इन्फ्लूएंझाचा संसर्ग वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. विशेषतः वृद्ध, लहान मुले, गर्भवती महिला तसेच फुफ्फुस, हृदय, मधुमेह यांसारख्या आजारांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींमध्ये संसर्ग गंभीर होण्याचा धोका अधिक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

एच१एन१ संसर्गामध्ये साधारणपणे ताप, खोकला, घसा खवखवणे, डोकेदुखी, अंगदुखी आणि थकवा यांसारखी लक्षणे दिसू शकतात. सध्या अनेक रुग्णांमध्ये दीर्घकाळ टिकणारा खोकला आणि तीव्र ताप आढळत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. वायुप्रदूषणामुळे फुफ्फुसांमध्ये होणारी सूज काही रुग्णांमध्ये खोकला आणि श्वास घेण्यासंबंधीची समस्या अधिक वाढवू शकते. त्यामुळे दीर्घकाळ खोकला किंवा तीव्र ताप असल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. डॉक्टरांनी संसर्गापासून बचावासाठी हात नियमितपणे स्वच्छ धुणे, आजारी असताना पुरेशी विश्रांती घेणे आणि इतर व्यक्तींच्या अतिजवळ जाणे टाळणे यांचा सल्ला दिला आहे. गरजेनुसार फ्लू प्रतिबंधक लसीकरणाचाही विचार करता येऊ शकतो. विशेषतः वृद्ध, लहान मुले,आणि आधीपासून गंभीर आजार असलेल्या व्यक्तींनी फ्लूसदृश लक्षणे आढळल्यास अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. दिल्लीत यंदा स्वाइन फ्लू म्हणजेच एच१एन१ संसर्गाचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. यावर्षी आतापर्यंत १७७७ रुग्णांची नोंद झाली असून, केवळ १४ दिवसांत ४३३ नवीन रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून, रुग्णालयांमध्ये उपचाराची पुरेशी व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज
दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...
डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!
- तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
- समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
- तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत पोहोचवायच्या आहेत का?
मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत

अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ
संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# यशस्वी होण्यासाठी चुकीचा मार्ग निवडू नका!

## शिरपूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे लोकार्पण

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर, धुळे | प्रतिनिधी:** "वकील बांधवांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी कधीही चुकीचा मार्ग निवडू नये. चुकीच्या मार्गाचा अवलंब केल्यास भविष्यात त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. सर्वसामान्य नागरिकांना सहज आणि न्याय्य पद्धतीने न्याय मिळेल, अशी सर्वसमावेशक न्यायव्यवस्था उभी करण्यासाठी प्रयत्न करा," असा महत्त्वपूर्ण सल्ला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्ना वराळे यांनी वकिलांना दिला शिरपूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिरपूर न्यायालयाच्या ठिकाणी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय सुरू होत असल्याने हा अत्यंत गौरवाचा आणि ऐतिहासिक क्षण असल्याचेही त्यांनी नमूद केले.

३३ वर्षांच्या पाठपुराव्याला यश शिरपूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय सुरू करण्यासाठी येथील वकील बांधव गेल्या ३३ वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करीत होते. अखेर त्यांच्या मागणीला यश आले असून न्यायाधीश प्रसन्ना वराळे यांच्या हस्ते न्यायालयाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी न्यायाधीश वराळे यांनी न्यायालयाच्या इमारतीची पाहणी केली. तसेच या मागणीसाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या शिरपूर तालुका वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांचे आणि वकिलांचे कौतुक केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन भूमीत न्यायालय शिरपूर न्यायालयाची स्थापना १९६८ मध्ये झाली होती. विशेष म्हणजे, १९३५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका खटल्याच्या कामानिमित्त



शिरपूर न्यायालयात आले होते, अशी माहिती यावेळी देण्यात आली. त्यामुळे ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या या न्यायालयाला जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचा दर्जा मिळणे ही शिरपूरसाठी अभिमानाची बाब असल्याचे उपस्थितांनी सांगितले. नवीन न्यायालयामुळे शिरपूर परिसरातील अनेक प्रकरणांचा स्थानिक पातळीवरच निपटारा होण्यास मदत होणार असून, नागरिकांना न्यायासाठी दूरवर जाण्याची गरज कमी होणार आहे.न्यायव्यवस्थेसोबत आरोग्य व्यवस्थेवरही मार्गदर्शन न्यायाधीश प्रसन्ना वराळे यांनी यावेळी न्यायव्यवस्थेच्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले. सर्वसामान्य नागरिकांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून न्यायव्यवस्था अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच आरोग्य व्यवस्थेसह विविध सामाजिक विषयांवरही त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना केल्या.मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्ना वराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सारंग कोतवाल, नितीन सूर्यवंशी, संजय देशमुख, किशोर संत, अभय वाघवसे, संतोष चपळगावकर, वैशाली पाटील, शैलेश ब्रह्मे, तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अजित कडेठाणकर, धुळे जिल्हा न्यायालयाच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश समृद्धी भीष्म, शिरपूर तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. शांताराम महाजन, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. ज्ञानेश्वर बागुल, ॲड. प्रदीप शिरसाट यांच्यासह न्यायव्यवस्था, वकील संघटना आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. "वकील बांधवांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी कधीही चुकीचा मार्ग निवडू नये. चुकीच्या मार्गाचा अवलंब केल्यास भविष्यात त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. सर्वसामान्य नागरिकांना सहज आणि न्याय्य पद्धतीने न्याय मिळेल, अशी सर्वसमावेशक न्यायव्यवस्था उभी करण्यासाठी प्रयत्न करा," असा महत्त्वपूर्ण सल्ला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्ना वराळे यांनी वकिलांना दिला शिरपूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.

# प्राचीन गंगेश्वर महादेव मंदिराबाहेर कचऱ्याचे साम्राज्य

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर| प्रतिनिधी :** मलकापूर शहरातील नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या प्राचीन गंगेश्वर महादेव मंदिराबाहेरील अस्वच्छतेने स्वच्छता व्यवस्थेची पोलखोल झाल्याचे चित्र आहे. मंदिराच्या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात घनकचरा साचला असून, हा कचरा गटारीत गेल्याने गटारी तुंबल्या आहेत. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरली असून, मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसह नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दररोज भाविकांची आणि नागरिकांची वर्दळ असलेल्या मंदिर परिसरात प्लास्टिकच्या पिशव्या, कागद आणि इतर घनकचरा साचलेला दिसत आहे. हा कचरा गटारीत गेल्याने पाण्याचा निचरा बंद झाला असून परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे.धार्मिक स्थळाच्या अगदी बाहेरील परिसरातच अशी अस्वच्छता असेल, तर शहरातील इतर भागांतील स्वच्छतेची अवस्था काय, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.मंदिराबाहेर



कचऱ्याचे ढीग आणि तुंबलेल्या गटारी दिसत असताना स्थानिक लोकप्रतिनिधींनी या परिसराची पाहणी केली का? संबंधित स्वच्छता कर्मचाऱ्यांना साफसफाईच्या सूचना दिल्या का? असे प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.आपल्या प्रभागातील समस्यांकडे नियमित लक्ष देणे ही त्यांची जबाबदारी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. साचलेला घनकचरा, तुंबलेल्या गटारी आणि दुर्गंधी ही केवळ अस्वच्छतेची बाब नसून सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर समस्या आहे. अशा ठिकाणी नियमित पाहणी करून तातडीने साफसफाई होणे अपेक्षित आहे. मात्र परिस्थिती कायम राहिल्याने नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवरही नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# पत्रकार सुशील थोरात हल्ला प्रकरणाचा जामखेडमध्ये निषेध

## पत्रकार कायद्यानुसार कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

**जामखेड | प्रतिनिधी :** 'साम' वृत्तवाहिनीचे अहिल्यानगर येथील प्रतिनिधी तथा ज्येष्ठ पत्रकार सुशील थोरात यांच्यावर गुरुवारी (दि. २० ऑगस्ट) झालेल्या हल्ल्याचा जामखेड तालुक्यातील पत्रकारांनी तीव्र निषेध केला. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या थोरात यांना न्याय मिळावा, तसेच हल्लेखोरांना तातडीने अटक करून पत्रकार संरक्षण कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी जामखेड पत्रकार संघाच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले. जामखेड तहसीलदार कार्यालयातील पुरवठा अधिकारी जालिंदर कदम तसेच जामखेड पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक वर्षा जाधव यांना पत्रकारांच्या शिष्टमंडळाने मागण्यांचे निवेदन सुपूर्द केले.

पत्रकारांवर होणारे हल्ले कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत, अशी ठाम भूमिका यावेळी पत्रकारांनी व्यक्त केली. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून, समाजातील विविध प्रश्न प्रशासन आणि जनतेसमोर मांडण्याचे महत्त्वाचे कार्य पत्रकार करतात. त्यामुळे पत्रकारांवर हल्ले होणे ही लोकशाहीसाठी गंभीर बाब आहे. भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासन व पोलिसांनी कठोर आणि ठोस पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. 'पत्रकारांना निर्भय वातावरण मिळावे' पत्रकार संघाचे अध्यक्ष नासीर पठाण म्हणाले, "पत्रकार सुशील थोरात यांच्यावर झालेला हल्ला अत्यंत गंभीर आहे. पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत हल्लेखोर आरोपींवर कठोर कारवाई करून पत्रकारांना सुरक्षित वातावरण मिळेल, असा स्पष्ट संदेश प्रशासनाने द्यावा." जामखेड मीडिया क्लबचे अध्यक्ष सुदाम वराट यांनीही हल्ल्याचा तीव्र निषेध करत, "पत्रकारांवर हल्ला करणाऱ्या आरोपींवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे. पत्रकार निर्भयपणे काम करू शकतील, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती पावले उचलावीत," अशी मागणी केली. संजय वारभोग यांनी पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न गांभीर्याने घेण्याची गरज व्यक्त केली. "पत्रकारांवर हल्ला करण्याचे धाडस पुन्हा कोणी करणार नाही, अशी कठोर कारवाई आरोपींवर झाली पाहिजे," असे त्यांनी सांगितले. किरण रेडे म्हणाले, "पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. समाजातील प्रश्न प्रशासन आणि जनतेसमोर मांडण्याचे काम पत्रकार करतात. अशा पत्रकारावरच हल्ला होत असेल तर ही गंभीर बाब आहे. त्यामुळे हल्लेखोरांवर कठोर कारवाई झाली पाहिजे." पत्रकारांची एकमुखी मागणी सुशील थोरात यांच्यावरील हल्ल्याची सखोल चौकशी करून सर्व संबंधित आरोपींना तातडीने ताब्यात घ्यावे आणि पत्रकार संरक्षण कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी जामखेड तालुक्यातील पत्रकारांनी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष नासीर पठाण, जामखेड मीडिया क्लबचे अध्यक्ष सुदाम वराट, ज्येष्ठ पत्रकार अशोक निमोणकर, संजय वारभोग, पप्पू सय्यद, किरण रेडे, अजय अवसरे, अविनाश बोधले, निलेश वनारसे, नासीर चाचू, मयुर भोसले यांच्यासह तालुक्यातील बहुसंख्य पत्रकार व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# 'ग्रीन डे' आणि 'फूड फिस्टा' उत्साहात संपन्न

## पर्यावरण संवर्धनासोबतच व्यवहारज्ञानाचे धडे

जन सम्राट टाईम्स

**पाळधी बु. | प्रतिनिधी:** भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, पाळधी बु. येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा 'ग्रीन डे आणि फूड फिस्टा' हा अभिनव उपक्रम उत्साहपूर्ण आणि आनंदमय वातावरणात संपन्न झाला. पर्यावरणाचे महत्त्व, निरोगी आहार, स्वच्छता, सर्जनशीलता, सहकार्य आणि व्यवहारज्ञान यांची विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूती मिळावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'ग्रीन डे'निमित्त विद्यार्थ्यांनी हिरव्या रंगाचे आकर्षक पोशाख परिधान केले होते.

शाळेचा परिसर विविध हिरव्या रंगांच्या वस्तू, फळे, भाज्या आणि पर्यावरण संवर्धनाशी संबंधित उपक्रमांनी सजविण्यात आला. विद्यार्थ्यांनी *'Go Green'*चा संदेश देत पर्यावरण रक्षणाचे महत्त्व विविध कृतींतून अधोरेखित केले. ज्युनिअर आणि सीनिअर वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'Hand Print Activity' घेण्यात आली. हातांचे ठसे वापरून विद्यार्थ्यांनी विविध कलाकृती साकारल्या. या उपक्रमातून त्यांच्या कल्पनाशक्तीला



वाव मिळण्याबरोबरच 'आपल्या हातून निसर्गाचे संवर्धन' हा संदेश देण्यात आला. नर्सरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष 'भेळ पार्टी' आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी भेळ तयार करण्याच्या प्रक्रियेत उत्साहाने सहभाग घेतला. मित्रमैत्रिणींसोबत भेळीचा आनंद घेताना चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्साह आणि आनंद वातावरणात आणखी रंग भरत होता. फूड फिस्टा ठरला विशेष आकर्षण कार्यक्रमातील 'फूड फिस्टा' हा विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल्स उभारले. चाट, भेळ, स्नॅक्स, गोड पदार्थ यांसह विविध खाद्यपदार्थांची मांडणी करण्यात आली होती. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी केवळ खाद्यपदार्थांची विक्री केली नाही, तर स्टॉलची सजावट, पदार्थांची मांडणी, ग्राहकांशी संवाद, विक्री आणि आर्थिक व्यवहार यामध्येही सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे त्यांना नियोजन, संघभावना, नेतृत्व, संवादकौशल्य, वेळेचे नियोजन आणि जबाबदारी यांचे प्रत्यक्ष धडे मिळाले.शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल्सना भेट देऊन खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. त्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

संस्थेचे मार्गदर्शन या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. विक्रम दादा गुलाबरावजी पाटील आणि सचिव मा. श्री. प्रताप दादा पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सामाजिक, भावनिक, सर्जनशील आणि व्यावहारिक कौशल्यांचा विकास व्हावा, यासाठी अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांना संस्थेच्या वतीने सातत्याने प्रोत्साहन दिले जाते.

# गरिबीमुळे शिक्षण थांबू नये; माजी विद्यार्थिनीच्या स्मृतिप्रीत्यर्थ शाळेला पाठ्यपुस्तकांची भेट!

## नारखेडे कुटुंबीयांकडून विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। (प्रतिनिधी):** नगरपरिषद संचलित म्युनिसिपल हायस्कूल, भुसावळ येथे माजी विद्यार्थिनी स्वर्गीय मंजुषा सुधाकर नारखेडे (पूर्वाश्रमीच्या रेखा भंगाळे) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबीयांकडून विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकांचे संच भेट देण्यात आले. गरिबीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती आणि शिक्षणासाठी येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन सुधाकर नारखेडे यांनी इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय पाठ्यपुस्तकांचे प्रत्येकी पाच संच शाळेला भेट दिले. या पाठ्यपुस्तकांचे वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना करण्यात आले. यावेळी शालेय समितीचे चेअरमन राजेंद्र आवटे, नगरसेविका सीमा नरवाडे, मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने, माजी मुख्याध्यापक



बी. वाय. सोनवणे, शिक्षिका सरला सावकारे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त वह्यांचे वाटप याच कार्यक्रमात शाळेचे माजी मुख्याध्यापक बी. वाय. सोनवणे यांनी त्यांचा मुलगा स्वर्गीय गौरव सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप केले. शिक्षणाच्या क्षेत्रात गरजू विद्यार्थ्यांना मदत करून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. शैक्षणिक साहित्याच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे उपस्थितांनी सांगितले. गरजू विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, वह्या आणि अन्य शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणाऱ्या नारखेडे व सोनवणे कुटुंबीयांच्या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. "आर्थिक परिस्थितीमुळे एकाही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये. समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेतल्यास अनेक गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहण्यास मदत होईल," असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन एस. टी. चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिष्यवृत्ती विभागासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लाडकुबाई विद्यामंदिरात अन्नसुरक्षा व पोषणाबाबत जनजागृती

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी:** कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण संस्था संचलित लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिर, भडगाव येथे 'ईट राईट स्कूल' उपक्रमांतर्गत विद्यार्थी व पालकांसाठी अन्नसुरक्षा आणि पोषण विषयक जनजागृती सत्र उत्साहात घेण्यात आले. सुरक्षित, पौष्टिक आणि संतुलित अन्नाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक



म्हणून डॉ. सुवर्णा पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक कमलेश शिंदे होते. यावेळी विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकस आहाराचे महत्त्व पटवून दिले मार्गदर्शन करताना डॉ. सुवर्णा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी संतुलित आणि पौष्टिक आहाराचे महत्त्व स्पष्ट केले. आहारात हिरव्या पालेभाज्या, ताजी फळे, कडधान्ये, दूध व दुग्धजन्य पदार्थ, पौष्टिक धान्ये तसेच पुरेशा प्रमाणात पाण्याचा समावेश करण्याचा सल्ला त्यांनी दिला. जंक फूड, अतिप्रमाणात तेलकट पदार्थ आणि गोड पदार्थांचे सेवन टाळावे, असेही त्यांनी सांगितले. आरोग्यदायी आहाराच्या सवयी बालपणापासूनच अंगीकारल्यास भविष्यात अनेक आरोग्यविषयक समस्या टाळता येऊ शकतात.

# टिटवाळ्यात २६ ऑगस्टला 'खान्देशी कौटुंबिक स्नेहसंमेलन'

## सामाजिक एकोपा व संस्कृतीच्या जतनाचा उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**टिटवाळा | प्रतिनिधी:** खान्देश उत्कर्ष सामाजिक संस्था, टिटवाळा यांच्या वतीने *'खान्देशी कौटुंबिक स्नेहसंमेलन २०२६'*चे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत टिटवाळा पूर्व येथील गुरवली रोडवरील, काळू नदीच्या काठी असलेल्या रिव्हर व्ह्यू रिसॉर्ट येथे हे स्नेहसंमेलन होणार आहे. खान्देशातील बंधू-भगिनी व नागरिकांना एका व्यासपीठावर एकत्र आणणे, परस्पर स्नेह, आपुलकी आणि सामाजिक एकोपा वाढविणे तसेच नव्या पिढीला खान्देशची संस्कृती, परंपरा आणि सामाजिक मूल्यांची ओळख करून देणे, हा या स्नेहसंमेलनाचा प्रमुख उद्देश आहे. मान्यवरांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर ॲड. हर्षली चौधरी थविल, नगरसेविका सौ. उपेक्षा शक्तिवान भोईर, नगरसेवक संतोष आप्पा तरे, बंदेश जाधव, माजी नगरसेवक सुरेश भोईर, शिवसेना शहरप्रमुख किशोरभाई शुक्ला, शिवसेना विभागप्रमुख दादा किस्मतराव, भाजपचे परेशभाई गुजरे, रिजन्सी सर्व फेडरेशनचे अध्यक्ष दीपक भाऊ कांबळे, मनसे उपशहरप्रमुख दिनेश भोय, अण्णासाहेब तरे, टिटवाळा महोत्सवाचे अध्यक्ष विजय भाऊ देशकर यांच्यासह पत्रकार राजू टपाल व ननावरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



आयोजकांच्या वतीने सर्व मान्यवरांनी आपल्या प्रेरणादायी उपस्थितीने आणि मार्गदर्शनाने कार्यक्रमाची शोभा वाढवून आयोजकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आयोजनासाठी पदाधिकाऱ्यांचे परिश्रम स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. प्रवीण वाणी, अध्यक्ष ॲड. विलास भारती, कार्याध्यक्ष विवेक शुक्ल, उपाध्यक्ष राजेंद्र मेखे, सरचिटणीस संजय चौधरी, खजिनदार रविंद्र पिंपळे, पदमसिंह बाविस्कर, अरुण सोनार, दिलीप राठोड, नरेंद्र बाविस्कर, दिगंबर सोनार, दीपक सोनार, मनीषाताई वारडे, शिवव्याख्याता यशोदाताई पाटील, सौ. कल्पनाताई चौधरी व सौ. विजयाताई बडगुजर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. ॲड. विलास भारती यांनी दिली. खान्देशी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे खान्देशी संस्कृती, सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कौटुंबिक स्नेहसंमेलनास खान्देशी समाजबांधवांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# युवा नेते लखीचंदभाऊ पाटील यांची युवासेना जळगाव लोकसभा अध्यक्षपदी निवड

## जळगाव मतदारसंघात युवासेनेची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी :** शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेनेच्या पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघासह जळगाव लोकसभा मतदारसंघातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. '

यामध्ये युवा नेते लखीचंदभाऊ प्रकाश पाटील यांची युवासेना जळगाव लोकसभा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल पाचोरा-भडगाव मतदारसंघाचे आमदार किशोरआप्पा पाटील यांनी लखीचंदभाऊ पाटील यांच्यासह सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार किशोरआप्पा पाटील यांनी विश्वास व्यक्त केला की, नवनियुक्त लोकसभा अध्यक्ष लखीचंदभाऊ पाटील आणि सर्व पदाधिकारी तळागाळातील नागरिकांपर्यंत शिवसेनेचे विचार तसेच शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना प्रभावीपणे पोहोचवतील. युवा नेतृत्वाच्या नव्या ऊर्जेमुळे पाचोरा, भडगावसह संपूर्ण जळगाव लोकसभा मतदारसंघातील संघटनात्मक बांधणीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नवनियुक्त पदाधिकारी युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, सचिव किरण साळी आणि मुख्य सचिव राहुल लोढे यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध झालेल्या अधिकृत यादीत पुढील पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

लखीचंद प्रकाश पाटील — लोकसभा अध्यक्ष, जळगाव



लोकसभा योगेश कौतिक पाटील — जिल्हा संघटक, पाचोरा विकास सुरेश महाजन — जिल्हा संघटक, पाचोरा, भडगाव, चाळीसगाव राकेश संजय पाटील — जिल्हा सरचिटणीस, भडगाव मयूर सुधाकर महाजन — जिल्हा सरचिटणीस, पाचोरा नितीन देवाजी तायडे — जिल्हा समन्वयक, पाचोरा अनिल बारकू पाटील — जिल्हा उपाध्यक्ष, पाचोरा दुर्गेश अनिल वाघ — जिल्हा उपाध्यक्ष, भडगाव योगेश शांताराम ठाकरे — जिल्हा संघटक उपाध्यक्ष, पाचोरा राकेश नाना पाटील — जिल्हा समन्वय उपाध्यक्ष, पाचोरा पुरुषोत्तम अभिमान माळी — जिल्हा संघटक उपाध्यक्ष, भडगाव योगेश प्रवीण पाटील — जिल्हा समन्वय उपाध्यक्ष, भडगाव युवा सैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण या महत्त्वपूर्ण नियुक्त्यांमुळे जळगाव लोकसभा क्षेत्रातील युवासेना पदाधिकारी व युवा सैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवनियुक्त पदाधिकारी आमदार किशोरआप्पा पाटील यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक कामाला गती देणार असून, आगामी काळात युवासेनेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. लखीचंदभाऊ पाटील यांच्या निवडीबद्दल शिवसेना व युवासेनेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समर्थकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# माणुसकी अजून जिवंत! नशिराबाद पोलिसांसह नागरिकांनी अनोळखी व्यक्तीला दिला उपचारांचा आधार

## मानसिकदृष्ट्या अस्वस्थ व्यक्तीला पोलिसांनी घेतले ताब्यात; उपचारासाठी दाखल

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद। प्रतिनिधी:** रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी अनोळखी व्यक्ती दिसली की अनेकजण दुर्लक्ष करून पुढे निघून जातात. मात्र, नशिराबाद येथे नागरिक आणि पोलिसांनी माणुसकीचे दर्शन घडवत मानसिकदृष्ट्या अस्वस्थ अवस्थेत आढळलेल्या एका अनोळखी व्यक्तीला उपचाराचा आधार मिळवून दिला. पोलिसांनी त्याला वैद्यकीय तपासणीनंतर चोपडा येथील मानव सेवा तीर्थ येथे पुढील उपचारासाठी दाखल केले. दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास झिपरू अण्णा महाराज प्रवेशद्वाराजवळ रुपेश माळी यांच्या चहाच्या टपरीवर एक अनोळखी व्यक्ती आली. त्याने माळी यांच्याकडे विमलची मागणी केली. मात्र, विमल उपलब्ध नसल्याचे सांगून, "तुला काही खायचे असेल तर सांग, ते मी देतो," असे माळी यांनी सांगितले. मात्र, संबंधित व्यक्तीने त्यास नकार दिला. विसंगत उत्तरे आल्याने नागरिकांना संशय यावेळी पोलीस दक्षता संपादक चंदन पाटील, साईमत प्रतिनिधी, डॉ. दीपक लोखंडे, दीपक बोंडे आणि विशाल पवार उपस्थित होते. त्यांनी संबंधित व्यक्तीची आपुलकीने विचारपूस केली. तो कुठून आला, त्याला कुठे जायचे आहे.

तसेच त्याचे कपडे कुठे आहेत, याबाबत विचारणा केली असता त्याने दिलेली उत्तरे विसंगत आणि समाधानकारक नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर डॉ. दीपक लोखंडे आणि चंदन पाटील यांनी तत्काळ सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांना माहिती दिली. त्यांनी तातडीने पोलीस



पथक घटनास्थळी पाठवून संबंधित व्यक्तीला नशिराबाद पोलीस ठाण्यात आणले. वैद्यकीय तपासणीनंतर मानव सेवा तीर्थ येथे दाखल पोलिसांनी सखोल चौकशी केली असता संबंधित व्यक्तीची मानसिक स्थिती अस्वस्थ असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांनी त्याला जळगाव येथील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याला मानसिक आरोग्यविषयक उपचारांची आवश्यकता असल्याचे सांगितले. यानंतर नशिराबाद पोलिसांनी त्या व्यक्तीला चोपडा येथील मानव सेवा तीर्थ येथे पुढील उपचारासाठी दाखल केले. तेथील डॉक्टरांनी योग्य उपचार करून त्याला लवकरात लवकर बरे करण्याचा विश्वास व्यक्त केला. त्याच्या कुटुंबीयांचा शोध लागल्यानंतर त्याला कुटुंबीयांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही सांगण्यात आले. यापूर्वीही १७ ऑगस्टला अशीच घटना दरम्यान, दि. १७ ऑगस्ट रोजी नशिराबाद परिसरात अशाच प्रकारची घटना घडली होती. त्यावेळीही एका अनोळखी व्यक्तीला नशिराबाद पोलिसांनी मानव सेवा तीर्थ येथे उपचारासाठी दाखल केले होते. तो कुठून आला, त्याला कुठे जायचे आहे, तसेच त्याचे कपडे कुठे आहेत, याबाबत विचारणा केली असता त्याने दिलेली उत्तरे विसंगत आणि समाधानकारक नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर डॉ. दीपक लोखंडे आणि चंदन पाटील यांनी तत्काळ सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांना माहिती दिली. त्यांनी तातडीने पोलीस पथक घटनास्थळी पाठवून संबंधित व्यक्तीला नशिराबाद पोलीस ठाण्यात आणले. उपचारानंतर त्याने आपले नाव अमरजीत असून आपण बिहारमधील रहिवासी असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्या कुटुंबीयांचा शोध घेऊन त्याला त्यांच्या स्वाधीन केले. अनोळखी व्यक्ती आढळल्यास मदतीचे आवाहन मानसिकदृष्ट्या अस्वस्थ किंवा अनोळखी व्यक्ती परिसरात आढळल्यास तिच्याकडे दुर्लक्ष न करता जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. "तुमचा एक मदतीचा हात एखाद्या व्यक्तीला पुन्हा त्याच्या कुटुंबापर्यंत पोहोचवू शकतो," हा संदेश या घटनेतून अधोरेखित झाला आहे. नशिराबाद पोलिसांसह जागरूक नागरिकांनी दाखविलेल्या संवेदनशीलतेमुळे 'माणुसकी अजून जिवंत आहे' याचा प्रत्यय आला असून, त्यांच्या या कार्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी प्रशिक्षण शिबिर



जन सम्राट टाईम्स

**सोयगाव। प्रतिनिधी :** येथील नालंदा बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने तालुकास्तरीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण व चिंतन शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात संघटनेची पुढील वाटचाल, कार्यकर्त्यांची भूमिका आणि धम्मप्रसाराच्या विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरासाठी सोयगाव तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समता सैनिक दलाचे पदाधिकारी व सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात संघटनेची कार्यपद्धती अधिक प्रभावी करणे, बुद्ध विहारांचे सक्षमीकरण, धम्माचा प्रचार व प्रसार तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या भारतीय बौद्ध महासभेचे कार्य गावागावांत पोहोचविण्यासंदर्भात सखोल चिंतन करण्यात आले. यावेळी आयु. डॉ. राजाराम बर्गे सर आणि आयु. किशोर जोहरे सर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. संघटनेच्या माध्यमातून सामाजिक व धम्मविषयक कार्य अधिक व्यापक करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रियपणे योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले. शिबिराच्या माध्यमातून उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटनात्मक कार्याची दिशा मिळाली असून, आगामी काळात भारतीय बौद्ध महासभेचे कार्य अधिक प्रभावीपणे गावागावांत पोहोचविण्याचा निर्धार करण्यात आला.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# विद्यापीठस्तरीय 'उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी सेवा गौरव'

## संजय तोडे पुरस्काराने सन्मानित




जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी :** धरणगाव येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी संजय भीमराव तोडे यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यातर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या *"उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी सेवा गौरव पुरस्कार-२०२५'*ने सन्मानित करण्यात आले. विद्यापीठात आयोजित कार्यगौरव सोहळ्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते संजय तोडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. सोपान इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य प्रा. डी. आर. पाटील, डॉ. राजेंद्र नन्नवरे, डॉ. कांचन महाजन यांच्यासह विद्यापीठातील विविध अधिकारी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संजय तोडे यांनी महाविद्यालयातील आपल्या सेवाकाळात प्रशासकीय कामकाज, विद्यार्थी व महाविद्यालयीन व्यवस्थापनाशी संबंधित विविध जबाबदाऱ्या कार्यक्षमतेने पार पाडल्या. त्यांच्या सेवाभावी वृत्तीची, कामातील तत्परतेची आणि जबाबदारीने केलेल्या योगदानाची दखल घेत त्यांना विद्यापीठस्तरीय हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संजय तोडे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशामुळे धरणगाव परिसरातूनही त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी संजय भीमराव तोडे यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यातर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या *"उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी सेवा गौरव पुरस्कार-२०२५'*ने सन्मानित करण्यात आले. विद्यापीठात आयोजित कार्यगौरव सोहळ्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते संजय तोडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# नाहाटा महाविद्यालयात 'जिमखाना डे' उत्साहात

## विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकलेल्या खेळाडूंचा गुणगौरव

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। प्रतिनिधी:** नाहाटा महाविद्यालयाच्या जिमखाना विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील 'जिमखाना डे' गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील विविध क्रीडा प्रकारांमध्ये विद्यापीठ, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या क्रीडा कौशल्याचा गौरव करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी टेनिस, क्रिकेट, लॉन टेनिस, बॅडमिंटन, मल्लखांब, योगविद्या आणि शरीरसौष्ठव आदी विविध क्रीडा प्रकारांमध्ये यश संपादन केले आहे. या खेळाडूंच्या वर्षभरातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत 'जिमखाना डे'च्या निमित्ताने त्यांचा गुणगौरव करण्यात आला. संपूर्ण शैक्षणिक वर्षातील क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक सचिन जोहरे, तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक तुषार जोहरे यांना प्रदान करण्यात आले. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक तेजस झोपे,




रिशा चंद्रा आणि मुशरब खान यांना विभागून देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. बी. एच. बऱ्हाटे होते. विशेष उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. डी. एन. पाटील तसेच जिमखाना समितीचे सदस्य उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिमखाना विभागप्रमुख डॉ. आनंद उपाध्याय यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना समिती सदस्य अख्तर खान, डॉ. पी. एच. इंगोले, डॉ. ए. जे. हिवाळे, डॉ. एस. डी. येवले, डॉ. एम. जे. जाधव, डॉ. यु. ए. फेगडे, डॉ. एच. व्ही. पाटील, डॉ. एस. आर. भिरूड, डॉ. पी. एम. महाजन, डॉ. एस. एस. कोलते तसेच क्रीडाप्रेमी विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्यासाठी प्रेरणा निर्माण झाली. महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेला पुढे नेण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.या खेळाडूंच्या वर्षभरातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत 'जिमखाना डे'च्या निमित्ताने त्यांचा गुणगौरव करण्यात आला. संपूर्ण शैक्षणिक वर्षातील क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक सचिन जोहरे, तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक तुषार जोहरे यांना प्रदान करण्यात आले. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक तेजस झोपे, रिशा चंद्रा आणि मुशरब खान यांना विभागून देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. बी. एच. बऱ्हाटे होते. विशेष उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. डी. एन. पाटील तसेच जिमखाना समितीचे सदस्य उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

# पक्षाच्या बैठकीला ५० किमी जाणाऱ्यांनो, मुलांच्या पालक सभेला 'वेळ नाही' का?

## तरुणांनी शाळेच्या विकासासाठी जागृत होण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**नागपूर। (प्रतिनिधी):** "आमच्या नेत्याची बैठक आहे", "पक्षाचा मेळावा आहे" असे म्हटले की ग्रामीण भागातील अनेक तरुण आणि नागरिक स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून ५०-५० किलोमीटरचा प्रवास करत राजकीय बैठका आणि मेळाव्यांना आवर्जून उपस्थित राहतात. तासन्तास नेत्यांची भाषणे ऐकण्यासाठी वेळ काढणाऱ्या याच नागरिकांकडे मात्र आपल्या मुलांच्या शाळेतील पालक सभेसाठी एक तासही नसतो, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. या अनास्थेमुळेच अनेक सरकारी शाळांच्या विकासावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. पक्षाचा कार्यकर्ता होण्यापूर्वी आपल्या मुलाचा पालक व्हा! पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मात्र केवळ शिक्षक उपलब्ध करून दिल्याने शाळेचा सर्वांगीण विकास होणार नाही. शाळेच्या गुणवत्तेसाठी पालक, ग्रामस्थ



आणि स्थानिक नागरिकांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. आपल्या मुलाचा शैक्षणिक प्रवास योग्य दिशेने सुरू आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी पालकांनी नियमितपणे शाळेत जाऊन शिक्षकांशी संवाद साधणे गरजेचे आहे. मुलाची शैक्षणिक प्रगती, शाळेतील सुविधा, स्वच्छता, पिण्याचे पाणी, मुलींसाठी स्वच्छतागृह तसेच इतर मूलभूत सुविधांबाबत पालकांनी प्रश्न विचारले पाहिजेत. नेत्यांचे उंबरठे झिजवण्यापेक्षा शाळेचे उंबरठे झिजवा राजकीय पक्षांच्या बैठका, मेळावे आणि कार्यक्रमांना उपस्थित राहणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे. मात्र राजकीय सहभागासोबत सामाजिक आणि शैक्षणिक जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. नेत्यांच्या मागे धावण्यापेक्षा गावातील शाळेच्या प्रश्नांसाठी आवाज उठविणे अधिक परिणामकारक ठरू शकते. नेत्यांची मुले चांगल्या शैक्षणिक सुविधा असलेल्या शाळांमध्ये शिक्षण घेत असताना ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील मुलांनाही दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे गावातील पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. पालक सभेला उपस्थित राहून पालकांनी शिक्षकांना थेट प्रश्न विचारावेत—"माझा मुलगा नीट शिकतोय का?", "त्याची शैक्षणिक प्रगती कशी आहे?", "शाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे का?", "मुलींसाठी स्वच्छ आणि सुरक्षित स्वच्छतागृह आहे का?" हे प्रश्न विचारणे म्हणजे केवळ शाळेवर टीका करणे नव्हे, तर आपल्या मुलांच्या भवितव्याची जबाबदारी स्वीकारणे होय.

# गावठी कट्टा बाळगणारा रावेर पोलिसांच्या जाळ्यात

जन सम्राट टाईम्स

**रावेर। प्रतिनिधी:** शहरातील बसस्थानकाच्या मागील परिसरात गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या २० वर्षीय तरुणाला रावेर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने अटक केली. ही कारवाई गुरुवारी, दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी करण्यात आली. पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, रावेर बसस्थानकाच्या मागे छोरीया मार्केटजवळ एक तरुण शस्त्र बाळगून संशयास्पदरीत्या फिरत आहे. माहितीची खातरजमा करण्यासाठी गुन्हे शोध पथकाने परिसरात पाहणी केली असता छोरीया मार्केटकडे जाणाऱ्या रस्त्यावर संशयास्पद हालचाली करणारा तरुण पोलिसांच्या निदर्शनास आला. पोलिसांनी त्याला थांबवून पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याकडे अंदाजे २५ हजार रुपये किमतीचा देशी बनावटीचा लोखंडी गावठी कट्टा तसेच एक हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे आढळून आली. चौकशीदरम्यान आरोपीने आपले नाव कृष्णा दत्तू पाटील (वय २०, रा. रोकडा हनुमान मंदिर नगर, रावेर) असे सांगितले. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल सुकेश



तडवी यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली असून, रावेर पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३९८/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायदा कलम ३ सह २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शस्त्र कोठून आणले? पोलिसांचा तपास सुरू आरोपीने गावठी कट्टा व काडतुसे कोठून मिळविली, ती कोणत्या उद्देशाने खरेदी केली तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याबाबत रावेर पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक संदीप गावीत आणि फैजपूर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली रावेर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप पाटील, सहायक पोलिस निरीक्षक हरिदास बोचरे तसेच गुन्हे शोध पथकातील पोलिस हेड कॉन्स्टेबल समाधान ठाकूर, पोलिस कॉन्स्टेबल सुकेश तडवी, श्रीकांत चव्हाण, विकार शेख, प्रमोद पाटील, विशाल पाटील व संभाजी यांनी केली.

# ममुराबाद येथे विलास साठे यांच्या घरी 'दशमाता भंडारा'

## ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

**ममुराबाद। प्रतिनिधी:** ममुराबाद येथे रहिवासी विलास उखडू साठे यांच्या निवासस्थानी दशमाता व्रताच्या सांगतेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'दशमाता भंडारा' कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या धार्मिक उपक्रमात गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत महाप्रसादाचा लाभ घेतला. दशमाता व्रताच्या सांगतेनिमित्त साठे परिवाराच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी दशमाता देवीची विधिवत पूजा, आरती तसेच विविध धार्मिक विधी पार पडले. त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी ममुराबाद गावातील अबालवृद्धांसह महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तिभावाने आणि आनंदी वातावरणात महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी धार्मिक कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल साठे परिवाराचे कौतुक केले. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून गावातील नागरिक एकत्र येतात. त्यामुळे सामाजिक एकोपा, परस्पर आपुलकी आणि बंधुभाव वाढण्यास मदत होते, अशी भावना यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केली.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साठे परिवारासह परिसरातील ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सहकार्यामुळे दशमाता भंडारा कार्यक्रम उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. ममुराबाद येथे रहिवासी विलास उखडू साठे यांच्या निवासस्थानी दशमाता व्रताच्या सांगतेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'दशमाता भंडारा' कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या धार्मिक उपक्रमात गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत महाप्रसादाचा लाभ घेतला. दशमाता व्रताच्या सांगतेनिमित्त साठे परिवाराच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी दशमाता देवीची विधिवत पूजा, आरती तसेच विविध धार्मिक विधी पार पडले.

# गाढोदे येथे 'सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ. बाबासाहेब आंबेडकर' विषयावर धम्मप्रवचन

## भारतीय बौद्ध महासभेच्या वर्षावास धम्मप्रवचन मालिकेतील सहावे पुष्प

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** भारतीय बौद्ध महासभा अर्थात दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, जळगाव जिल्हा (पूर्व) व जळगाव तालुका शाखेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे वर्षावास धम्मप्रवचन मालिका २०२६ आयोजित करण्यात आली आहे. या मालिकेतील सहावे पुष्प 'सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता गाढोदे, ता. जळगाव येथे गुंफले जाणार आहे. या कार्यक्रमात आयु. नी ज्योतीताई भालेराव (केंद्रीय शिक्षिका) या प्रमुख प्रवचनकार म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांचे ज्ञान, विचार, सामाजिक परिवर्तनातील योगदान तसेच बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारातील त्यांच्या भूमिकेवर यावेळी विचार मांडले जाणार आहेत. जिल्हा पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती या धम्मप्रवचन कार्यक्रमाला भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पदाधिकारी तसेच केंद्रीय शिक्षक, शिक्षिका, बौद्धाचार्य, धम्म उपासक व उपासिका उपस्थित राहणार आहेत. यावेळी रविंद्र एन. वानखेडे (केंद्रीय शिक्षक, जिल्हा उपाध्यक्ष), भीमराव पवार (केंद्रीय शिक्षक, जिल्हा सचिव), बी. एस. पवार गुरुजी (जिल्हा संघटक), सुभाष सपकाळे (जिल्हा संघटक), प्रा. प्रितीलाल पवार (केंद्रीय शिक्षक), जयपाल धुरंधर गुरुजी (बौद्धाचार्य), सुनीताताई वानखेडे (महिला जिल्हा उपाध्यक्ष), विद्याताई झनके (महिला जिल्हा सचिव) आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. धम्मप्रचार व प्रसारासाठी वर्षावास उपक्रम भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून वर्षावासाच्या कालावधीत धम्मप्रवचन मालिका राबवून भगवान बुद्धांचा धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि सामाजिक समतेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याच उपक्रमाचा भाग म्हणून गाढोदे येथे हे धम्मप्रवचन आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाला जळगाव तालुका शाखेचे तालुकाध्यक्ष राजेश इंगळे, तालुका उपाध्यक्ष (संस्कार) जगदीश सपकाळे, सचिव (संस्कार) किरण सोनवणे, सचिव (संस्कार) शैलेश सोनवणे, तालुका कोषाध्यक्ष यशवंत जाधव, तालुका सरचिटणीस सागर सदावर्ते, महिला तालुका शाखा अध्यक्ष ज्योतीताई दाभाडे, महिला तालुका शाखा सरचिटणीस भारतीताई बिऱ्हाडे आणि महिला तालुका शाखा कोषाध्यक्ष वंदनाताई वानखेडे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. धम्मबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वर्षावास धम्मप्रवचन मालिकेतील या सहाव्या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, जळगाव तालुका व शहर शाखांचे पदाधिकारी, बौद्धाचार्य, माजी श्रामणेर, केंद्रीय शिक्षक-शिक्षिका तसेच धम्म उपासक व उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी वेळेपूर्वी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहावे, अशी सूचनाही आयोजकांनी केली आहे.

# आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीला नवे बळ

## आम्ही भारताचे लोक'च्या २१ जिल्ह्यात समन्वयकांची घोषणा

जन सम्राट टाईम्स

पुणे | प्रतिनिधी : 'आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ', महाराष्ट्र राज्याच्या संघटनात्मक विस्ताराला चालना देण्यासाठी २१ जिल्ह्यांसह नवी मुंबईच्या समन्वयकांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. यासोबतच राज्यस्तरावर १० युवा समन्वयकांचीही नियुक्ती करण्यात आली असून, या नव्या जबाबदाऱ्यांमुळे चळवळीच्या संघटनात्मक कार्याला अधिक व्यापकता मिळणार आहे. जिल्हा समन्वयक म्हणून मुंबई – जयेश सोळंकी, पुणे (प्रभारी) – ॲड. नितीन घोडके, पालघर – ॲड. अदिती पवार, ठाणे – गौतम धनावडे, नाशिक – सविता केदारे, अहिल्यानगर – दिनेश गायकवाड, यवतमाळ – संजय पाईकराव, चंद्रपूर – राजपाल जवादे, छत्रपती संभाजीनगर – सुरेश बनसोडे, बुलढाणा – शुद्धोदन गवई, रायगड – शांतेश जाधव, वाशिम (प्रभारी) – डॉ. अविनाश मनवर, नांदेड (प्रभारी) – संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर, सोलापूर – मनोज शिंदे, परभणी – संजय बगाटे, हिंगोली – श्रीनिवास अवचार, बीड – प्रो. डॉ. विठ्ठल जाधव, भंडारा – उमेश बारसागडे, जालना – प्रेमदास खिल्लारे, जळगाव – अजय इंगळे आणि सातारा – राजू मोरे यांची यिुक्ती करण्यात आली आहे. तसेच नवी मुंबई समन्वयकपदी ज्योती कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दहा युवा समन्वयकांचीही निवड राज्य युवा समन्वयक म्हणून विनोद गायकवाड, सुरेखा ढोणे, समाधान मस्के, दिप्ती जाधव, रेश्मा सावंत, प्रशांत देठे, सागर भडकुंबे, अमोल रणपिसे, सतीश साखरे आणि राहुल जोगदंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संविधानिक मूल्यांचा प्रसार करण्याचे आवाहन नवनियुक्त समन्वयकांनी प्रतिनिधी, सदस्य आणि कार्यकर्त्यांशी सातत्याने समन्वय साधून संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करावी. तसेच संविधानिक मूल्ये, सामाजिक समता, बंधुता आणि आंबेडकरी विचार समाजाच्या विविध घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

नव्या नियुक्त्यांमुळे राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये चळवळीचे कार्य अधिक गतिमान होण्यास मदत होणार असून, युवा शक्तीलाही संघटनात्मक कार्यात मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सर्व नवनियुक्त समन्वयकांचे 'आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ'च्या वतीने अभिनंदन करण्यात आले. याबाबतची माहिती महाराष्ट्र राज्याच्या मुख्य समन्वयक संदेश शालिनी संभाजी कर्डक यांनी दिली.'आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ', महाराष्ट्र राज्याच्या संघटनात्मक विस्ताराला चालना देण्यासाठी २१ जिल्ह्यांसह नवी मुंबईच्या समन्वयकांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. यासोबतच राज्यस्तरावर १० युवा समन्वयकांचीही नियुक्ती करण्यात आली असून, या नव्या जबाबदाऱ्यांमुळे चळवळीच्या संघटनात्मक कार्याला अधिक व्यापकता मिळणार आहे. नव्या नियुक्त्यांमुळे राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये चळवळीचे कार्य अधिक गतिमान होण्यास मदत होणार असून, युवा शक्तीलाही संघटनात्मक कार्यात मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये आज BAMCEFचे 40 वे राज्य अधिवेशन

## सामाजिक न्याय, जातनिहाय जनगणना, EVM, TET-NEETसह विविध प्रश्नांवर होणार मंथन

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी** : ऑल इंडिया बॅकवर्ड (SC, ST, OBC) अँड मायनॉरिटी कम्युनिटीज एम्प्लॉईज फेडरेशन (BAMCEF) आणि राष्ट्रीय मूलनिवासी संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित ४० वे राज्य अधिवेशन रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी पत्रकार परिषद घेऊन अधिवेशनातील प्रमुख विषय, सामाजिक प्रश्न आणि संघटनेची आगामी भूमिका याबाबत माहिती देण्यात आली. पत्रकार परिषदेचे नेतृत्व BAMCEFचे राज्याध्यक्ष डॉ. संजय गायकवाड यांनी केले. यावेळी ॲड. सुजाता चौदांते, भारत मुक्ती मोर्चा महिला आघाडीच्या राज्याध्यक्षा ज्योती मिसाळ, BAMCEFचे फुलटायमर प्रा. मनोज लोहे, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा सेवानिवृत्त ACP रियाजुद्दीन देशमुख यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित



होते. राजयोग लॉन्स येथे अधिवेशन हे राज्य अधिवेशन रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते रात्री ७ वाजेपर्यंत राजयोग लॉन्स मंगल कार्यालय, चिनार गार्डनच्या बाजूला, पडेगाव, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. अधिवेशनाचे उद्घाटन प्रसिद्ध आंबेडकरी शाहीर संभाजी भगत यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी BAMCEFचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विजय मनू, मिलिंद टिपणीस, सुरेश खोपडे आणि उत्तम सोनकांबळे उपस्थित राहणार आहेत. तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहे. महिलांच्या प्रश्नांवर विशेष चर्चा अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात 'महिलांचे राष्ट्रव्यापी संघटन उभारल्याशिवाय महिलांच्या समस्यांचे समाधान होऊ शकत नाही – एक चिंतन' या विषयावर चर्चा होणार आहे. यामध्ये उषा थोरात, ॲड. शबनम तोफेल बेग, ज्योती मिसाळ, हेमलता पाटील, ॲड. पूनम भोईर, डॉ. पंचशीला मोहोड, सरोज पैटणे आणि ॲड. छायाताई बलखंडे आदी मार्गदर्शन करणार आहेत. जातनिहाय जनगणना आणि सामाजिक न्यायावर मंथन अधिवेशनातील दुसऱ्या महत्त्वाच्या सत्रात जातनिहाय जनगणना, OBC समाजाचे प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्याय या विषयांवर चर्चा होणार आहे. तसेच EVM व निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, TET व NEET परीक्षांमधील सामाजिक न्यायाचे प्रश्न, स्वतंत्र मतदारसंघ, जातनिहाय वर्गीकरण, मागासवर्गीय व अल्पसंख्याक समाजाच्या हक्कांचे संरक्षण आदी मुद्द्यांवरही चर्चा करण्यात येणार आहे. संघटनेच्या आगामी सामाजिक आंदोलनांची दिशा, संविधानिक अधिकारांचे संरक्षण, समान प्रतिनिधित्व आणि शैक्षणिक संधी याबाबतही अधिवेशनात भूमिका निश्चित केली जाणार असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. राज्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती या अधिवेशनासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून BAMCEFचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनाच्या माध्यमातून सामाजिक न्याय, लोकशाही, समान प्रतिनिधित्व आणि संविधानिक मूल्यांच्या संरक्षणासाठी आगामी काळातील संघटनात्मक व सामाजिक कार्यक्रमांची दिशा निश्चित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी गोरखनाथ वेताळ, मंगला थोरात आणि डॉ. संजय गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. राजयोग लॉन्स येथे अधिवेशन हे राज्य अधिवेशन रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते रात्री ७ वाजेपर्यंत राजयोग लॉन्स मंगल कार्यालय, चिनार गार्डनच्या बाजूला, पडेगाव, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. अधिवेशनाचे उद्घाटन प्रसिद्ध आंबेडकरी शाहीर संभाजी भगत यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी BAMCEFचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विजय मनू, मिलिंद टिपणीस, सुरेश खोपडे आणि उत्तम सोनकांबळे उपस्थित राहणार आहेत.

# धरणगावातील स्थलांतरित कामगारांना HIV/AIDS जनजागृतीचे धडे

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | (प्रतिनिधी):** धरणगाव : राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इंटेंसिफाइड कॅम्पेन 3.0 अंतर्गत वल्लभ जिनिंग, जळगाव रोड, धरणगाव येथे स्थलांतरित कामगारांसाठी एचआयव्ही/एड्स जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. ग्रामीण रुग्णालय धरणगाव येथील ICTC केंद्र आणि राष्ट्र विकास मायग्रंट टी.आय. प्रोजेक्ट, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. कॉटन जिनिंगमध्ये कार्यरत स्थलांतरित कामगारांना ए च आ य व्ही / ए ड् स वि ष यी शास्त्रीय माहिती देण्यात आली. एचआयव्हीचा संसर्ग होण्याचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय तसेच शासनाकडून उपलब्ध असलेल्या मोफत उपचार व आरोग्य सुविधांची सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली. यासोबतच एचआयव्ही आणि एड्स (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. बाधित व्यक्तींना मिळणारे कायदेशीर संरक्षण, त्यांचे हक्क आणि गोपनीयतेचा अधिकार याविषयी कामगारांना जागरूक करण्यात आले. बॅनर व पोस्टरच्या माध्यमातूनही एचआयव्ही प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच इच्छुक कामगारांनी HIV तपासणी करून घ्यावी, यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. जिनिंग व्यवस्थापनासह आरोग्य विभागाचा सहभाग कार्यक्रमाला जिनिंगचे मालक हरीश अग्रवाल, मॅनेजर सुशांत खेळे, सुपरवायझर दीपक महाजन व प्रकाश महाजन यांच्यासह ग्रामीण रुग्णालय धरणगावचे ICTC समुपदेशक ज्ञानेश्वर शिंपी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ राजेश्वर काकडे, राष्ट्र विकास Migrant T.I. प्रोजेक्टचे प्रोजेक्ट मॅनेजर अमोल सूर्यवंशी, ORW राहुल सूर्यवंशी, राहुल पवार तसेच जिनिंगमधील कामगार बंधू-भगिनी उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे जनजागृती कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. स्थलांतरित



कामगारांमध्ये HIV/AIDS संदर्भातील गैरसमज दूर करून प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.ग्रामीण रुग्णालय धरणगाव येथील ICTC केंद्र आणि राष्ट्र विकास मायग्रंट टी.आय. प्रोजेक्ट, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. कॉटन जिनिंगमध्ये कार्यरत स्थलांतरित कामगारांना ए च आ य व्ही / ए ड् स वि ष यी शास्त्रीय माहिती देण्यात आली. एचआयव्हीचा संसर्ग होण्याचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय तसेच शासनाकडून उपलब्ध असलेल्या मोफत उपचार व आरोग्य सुविधांची सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली. यासोबतच एचआयव्ही आणि एड्स (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. बाधित व्यक्तींना मिळणारे कायदेशीर संरक्षण, त्यांचे हक्क आणि गोपनीयतेचा अधिकार याविषयी कामगारांना जागरूक करण्यात आले. बॅनर व पोस्टरच्या माध्यमातूनही एचआयव्ही प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच इच्छुक कामगारांनी HIV तपासणी करून घ्यावी, यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

# लोकप्रतिनिधींच्या घरांसमोर आंदोलन करा!

## साखर दरवाढीवरून ॲड. प्रकाश आंबेडकर आक्रमक

जन सम्राट टाईम्स

संभाजीनगर| प्रतिनिधी : वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ वाजता सुभेदारी गेस्ट हाऊस, औरंगाबाद येथे महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी संबोधित केले. यावेळी त्यांनी देशातील साखरेचे वाढते दर, इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात येणारी साखर व मळी, तसेच आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकारवर जोरदार टीका केली.

ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, भारत यापूर्वी साखरेचा सरप्लस देश होता आणि साखर निर्यात केली जात होती. मात्र, सरकारच्या नियोजनाअभावी रॉ शुगर आणि मळी मोठ्या प्रमाणात इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात आली आहे. या कारणामुळे यावर्षी भारताला मोठ्या प्रमाणात साखर आयात करण्याची वेळ आली असून, त्याचा थेट परिणाम साखरेच्या किमतीवर होत असल्याचे त्यांनी सांगितले. आज साखरेचा भाव ८० रुपये आहे. येत्या १०-१२ दिवसांत तो १०० रुपयांवर जाऊ शकतो. मोदक आता गोड लागण्याऐवजी कडू



लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, असे ॲड. आंबेडकर म्हणाले. नवरात्र, दिवाळी यांसारखे सण जवळ येत असताना साखरेचे दर वाढल्यामुळे सर्वसामान्यांच्या सणांचा गोडवा हिरावला जात असल्याचेही त्यांनी म्हटले. पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्र देशातील साखर उत्पादनात मोठा वाटा उचलतो. जनतेने हे आंदोलन आपल्या हातात घेतले पाहिजे. जनता रस्त्यावर उतरली तरच साखरेतील गोडवा कायम राहील; अन्यथा कडूपणा सर्वांनाच सहन करावा लागेल, असे ते म्हणाले. हे व्यापक आंदोलन आहे. जनतेने सुरुवात केली तर आम्ही त्यांच्यासोबत राहू, अशी भूमिका ॲड. आंबेडकर यांनी स्पष्ट केली. सरकारच्या धोरणांविरोधात जनतेने तिरंगा घेऊन लोकप्रतिनिधींच्या घरांसमोर आंदोलन करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# 'मनरेगा' चांगली अन् प्रभावी योजना

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली ।** सर्वोच्च न्यायालयाने रद्द करण्यात आलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याचे (मनरेगा) कौतुक करताना ही एक "चांगली आणि प्रभावी योजना" असल्याचे म्हटले आहे. ही योजना कोणतीही मोफत खैरात नव्हती आणि ग्रामीण कामगारांचे शोषण करणारीही नव्हती, असे स्पष्ट मत न्यायालयाने व्यक्त केले.

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर सामाजिक कार्यकर्त्या अरुणा रॉय यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी सुरू होती. मनरेगांतर्गत रखडलेले वेतन भरपाईसह देण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण, चेरिल डिसोझा आणि नेहा राठी यांनी न्यायालयात मागणी केली की, संविधानाच्या कलम २१ (जीवनाचा अधिकार) अंतर्गत ग्रामीण भागातील कामाच्या वैधानिक हमीला 'मूलभूत अधिकार' असा दर्जा देण्यात यावा.

सुनावणीदरम्यान वकील प्रशांत भूषण यांनी तर्क दिला की, सन्मानजनक जीवन जगण्यासाठी किमान वेतनावर रोजगार मिळणे आवश्यक आहे. किमान वेतनापेक्षा कमी मोबदला देणे म्हणजे 'वेठबिगारी' किंवा 'सक्तीचे श्रम' आहे. यावर उत्तर देताना न्यायमूर्ती जोयमाल्य बागची यांनी नमूद केले की, किमान वेतनाची मर्यादा खूप जास्त ठेवल्यास रोजगाराच्या संधी कमी होण्याचा धोका असतो. तर सरन्यायाधीश कांत यांनी स्पष्ट केले की, वेतन हे सहसा तेथील स्थानिक परिस्थितीशी जोडलेले असते.

मनरेगाची जागा घेणाऱ्या नवीन 'व्हीबी-जी राम जी' कायद्यामुळे रोजगाराच्या संधींमध्ये ५० टक्के घट झाल्याचा दावा प्रशांत भूषण यांनी केला. ते म्हणाले की, नवीन कायद्यानुसार वर्षाला १०० ऐवजी १२५ दिवसांच्या कामाची हमी दिली असली तरी प्रत्यक्ष रोजगार कमी झाला आहे. तसेच, नवीन रचनेमुळे राज्यांवरील आर्थिक भार तिप्पट वाढला आहे. पूर्वी केंद्र आणि राज्याचा निधीचा वाटा ९०:१० असा होता, तो आता ६०:४० झाला आहे. यामुळे अनेक राज्यांकडे निधी उपलब्ध नसल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. न्यायाधीश व्ही. मोहना यांनी स्पष्ट केले की, नवीन कायद्याच्या चौकटीत आणि ताज्या आकडेवारीच्या आधारे या सर्व मुद्द्यांची नव्याने तपासणी करणे गरजेचे आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# शौर्यवीर प्रतिष्ठान ढोल पथक एकाच वेळी दोन ठिकाणी देणार सलामी

## सुभाष चौक आणि जी.एस. मैदानावर दहीहंडी उत्सवात रंगणार ढोलवादनाचा थरार

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** शहरातील सुप्रसिद्ध शौर्यवीर प्रतिष्ठान ढोल पथक यंदाच्या दहीहंडी उत्सवात एकाच वेळी दोन ठिकाणी ढोलवादनाची सलामी देणार आहे. शहरात प्रथमच अशा पद्धतीचा अनोखा प्रयोग करण्यात येणार असून, ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत दोन्ही ठिकाणी दहीहंडीचा उत्साह रंगणार आहे.

शौर्यवीर प्रतिष्ठानच्या वतीने सुभाषचंद्र बोस चौकातील दहीहंडी तसेच जी.एस. ग्राउंडवरील महिलांची दहीहंडी येथे एकाच वेळी ढोल पथकाची सलामी देण्यात येणार आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष चिन्मय नाझरकर यांनी ही माहिती दिली. सुभाष चौकात ७५



मुले, १५ मुलींचा सहभाग सुभाष चौक मित्र मंडळाच्या दहीहंडी उत्सवात ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत कार्यक्रम होणार आहे . या दहीहंडीमध्ये ७५ मुले आणि १५ मुली, अशा एकूण ९० गोविंदांचा सहभाग राहणार आहे. जी.एस. ग्राउंडवर महिलांची दहीहंडी दरम्यान, जी.एस. ग्राउंडवरील महिलांच्या दहीहंडी उत्सवातही याच वेळेत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. येथे ७० मुले आणि २० मुली, अशा एकूण ९० सहभागींचा सहभाग राहणार आहे. दोन्ही ठिकाणी शौर्यवीर प्रतिष्ठान ढोल पथकाच्या सलामीमुळे उत्सवाला विशेष रंगत येणार आहे. पाच वर्षांपासून पारंपरिक वाद्यांचा जागर शौर्यवीर प्रतिष्ठान ढोल पथक मागील पाच वर्षांपासून जळगाव शहरातील विविध सण-उत्सवांमध्ये ढोलवादनाच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. पारंपरिक वाद्यांचा वारसा जपत तरुणाईला या कलेशी जोडण्याचे काम प्रतिष्ठानकडून केले जात आहे. ढोलवादनाच्या माध्यमातून शहरातील विविध उत्सवांमध्ये सहभागी होत तरुणांमध्ये उत्साह निर्माण करण्याबरोबरच पारंपरिक संस्कृतीशी नाते दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रतिष्ठानच्या उपक्रमांकडे तरुणाईचा वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे अध्यक्ष चिन्मय नाझरकर यांनी सांगितले.एकाच वेळी दोन ठिकाणी ढोल पथकाची सलामी देण्याचा हा अनोखा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. जळगावकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दहीहंडी उत्सवाचा आनंद घ्यावा आणि शौर्यवीर प्रतिष्ठानच्या या उपक्रमाला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन अध्यक्ष चिन्मय नाझरकर यांनी केले आहे.

यंदाच्या दहीहंडी उत्सवात एकाच वेळी दोन ठिकाणी ढोलवादनाची सलामी देणार आहे. शहरात प्रथमच अशा पद्धतीचा अनोखा प्रयोग करण्यात येणार असून, ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत दोन्ही ठिकाणी दहीहंडीचा उत्साह रंगणार आहे.

शौर्यवीर प्रतिष्ठानच्या वतीने सुभाषचंद्र बोस चौकातील दहीहंडी तसेच जी.एस. ग्राउंडवरील महिलांची दहीहंडी येथे एकाच वेळी ढोल पथकाची सलामी देण्यात येणार आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष चिन्मय नाझरकर यांनी ही माहिती दिली. सुभाष चौकात ७५ मुले, १५ मुलींचा सहभाग सुभाष चौक मित्र मंडळाच्या दहीहंडी उत्सवात ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत कार्यक्रम होणार आहे.

# कारमध्ये सापडले ९ कोटींचे घबाड





जन सम्राट टाईम्स

बंगळूरु | प्रतिनिधी :' कर्नाटकातील बंगळूरु येथे एका कारमध्ये ९ कोटी रुपये रोकड सापडल्याने खळबळ उडाली. आयकर विभागाने ५०० रुपयांच्या नोटांनी भरलेली एक सुटकेस जप्त करून तपास सुरू केला. कारमधील दोन तरुण रोकडचा हिशोब देऊ न शकल्याने पोलिसांनी त्यांना अटक करून प्रकरणाचा तपास सुरू केला. पोलिसांच्या अहवालानुसार, ही घटना १८ ऑगस्ट रोजी घडली आणि आरोपींची चौकशी व तपासानंतर आज २२ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. रोकड भरलेल्या सुटकेससह पकडल्यावर ते दोघे तरुण घाबरले, त्यामुळे पोलिसांना संशय आला.बंगळूरू येथील आयकर विभागाच्या युनिट २२ चे उपसंचालक जगदीश यांनी सांगितले की, इलेक्ट्रॉनिक्स सिटी एक्सप्रेसवे टोल प्लाझानंतरच्या सिग्नलजवळ, पथकाने एक ह्युंदाई क्रेटा कार (क्रमांक केएल २० टी ८६२९) थांबवली. तपासणी केल्यावर, कारमध्ये ५०० रुपयांच्या नोटांचे बंडल असलेली एक सुटकेस सापडली, ज्यात एकूण ९ कोटी रुपये रोख रक्कम होती.

ही कार बंगळूरूहून तामिळनाडूतील होसूरकडे जात होती.